● बुधवार, दि. २५ डिसेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १४७ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ MAHMAR/2013/50827

## बिबट्याने केली हरणाची शिकार!

### शेतकरी व नागरिकांत भीतीचे वातावरण

अंबड तालुक्यात ऊसतोड सुरु झाल्यापासून बिबट्या हा वन्यजीव अनेक लोकांना दिसून येत आहे. या भागातील अनेक पाळीव प्राणी तसेच काळवीट यांचा बिबट्याने फडशा पडला आहे. ऊसतोडीमुळे त्याचे लपण क्षेत्र कमी होते. तसेच स्थलांतर करत असताना तो अनेक लोकांना दिसला आहे तरी घाबरून न जाता शेतात किंवा घरा जवळ लाईट लावावेत तसेच पाळीव प्राणी बंदिस्त ठेवावेत रात्रीच्या वेळी शेताला पाणी देताना काळजी घावी. टॉर्च वापरावी, गाणी लावावीत, समूहाने राहावे, मुलांची काळजी घ्यावी, शक्यतो रात्री घराबाहेर पडू नये.

**- कैलास कदम, वनरक्षक चिंचखेड जालना दक्षिण**




**अंबड । प्रतिनिधी -** तालुक्यातील धाकलगाव शिवारात गेल्या दोन म हिन्यांपासून बिबट्याची दहशत सुरु आहे. सोमवारी मध्यरात्री बिबट्याने एका हरणाची शिकार केल्याची घटना पुढे आली आहे. या घटनेमुळे शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, धाकलगाव शिवारात करण पवळ वस्ती जवळ सोमवारी रात्री शेतात पाणी देण्यासाठी गेले असता ऊसाच्या पाचटामध्ये एक हरिण मृतावस्थेत दिसून आले. गत काही दिवसांपासून या भागात बिबट्याचा वावर असल्याचे बोलल्या जात होते. त्यामुळे ही शिकार बिबट्यानेच केली असावी, असा संशय व्यक्त करीत शेतकऱ्यांनी अंबड वनविभागाचे वनरक्षक कैलास कदम यांच्याशी संपर्क साधून या घटनेची माहिती दिली. दरम्यान, धाकलगाव शिवारात बिबट्याने हरणाची शिकार केल्याची माहिती वाऱ्यासारखी पसरल्यामुळे परिसरातील शेतकरी व नागरिकांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. विशेष म्हणजे याच शिवारात एक महिन्यापूर्वी बळिराम जऱ्हाड या शेतकऱ्याच्या गायीची शिकार झाली होती. या परिसरात अधून-मधून बिबट्याचे दर्शन होत असल्यामुळे शेती कामासाठी जाणारे शेतकरी व मजुरांत भीतीचे वातावरण पसरलेले होते. बिबट्याचा वावर वाढल्यामुळे घाबरलेल्या नागरिक व शेतकऱ्यांनी या परिसरात पिंजरा लावण्याची मागणी वन विभागाकडे केली. या घटनेमुळे भयभित झालेल्या शेतकऱ्यांना वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले, घाबरून न जाता रात्री घराबाहेर पडु नका, लहान मुलांची काळजी घ्यावी, आपले पाळीव प्राणी बंदिस्त ठेवण्याचे आवाहन वनअधिकाऱ्यांनी केले. वन विभागाशी संपर्क साधल्यानंतर मंगळवारी सकाळी घटनास्थळी एस. एन. मुंडे सहाय्यक वनसवंरक्षक, व्हि.एम.दौंड वनपारिक्षेत्र अधिकारी, बी. एम.पाटील वनपरिमंडळ अधिकारी अंबड, के.जे कदम वनरक्षक आदींच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

त्यावेळी अमोल पवळ, अभिषेक पवळ, शंकर नावडे, सचिन शेंडगे, विजय शेंडगे, गोपाल उंडे, गणेश घाडगे आदींसह परिसराती शेतकरी, नागरिकांची उपस्थिती होती

बिबट्याने हरणीची शिकार केली. त्यामुळे गावातील सर्व शेतकरी भयभीत आहे. बिबट्या महिन्यात एकदा तरी दिसतो. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी पकडायला पाहिजे. आम्हाला शेताला पाणी देण्यासाठी रात्री उशीरा लाईट येते. लाईट दिवसा द्यावी, असे निवेदन आम्ही महावितरण विभागाकडे देणार असल्याचे सुदाम पवळ यांनी सांगितले आहे.

## शासकीय विश्रामगृहाचे काम निकृष्ट दर्जाचे

### कुंपणच शेत खातं... न्याय कोणाकडे मागणार - अशोक वायाळ

**मंठा । प्रतिनिधी -** येथील शासकिय विश्रामगृहाचे काम निकृष्ट दर्जाये होत आहे या बाबत तक्रार (ता१६) रोजी दिलेली होती. त्यानंतर संबधीत यंत्रणेने कामाच्या ठिकाणी असलेली निकृष्ट दर्जाची रेती ही कामापासून केवळ २५ ते ३० फुट अंतरावर सरकवून घेतली आणि परत काम चालू आहे.

वास्तविक पाहता सदरील कामावर सिमेंट च्या विटा आहेत त्या विटा देखील निकृष्ट दर्जाच्या वापरण्यात येत आहे.कामावर

अतिशय कमी प्रमाणात पाण्याचा वापर होत आहे. कॉलमची जाडी देखील अंदाजपत्रकात नमुद केल्याप्रमाणे दिसून येत नाही. त्यामुळे भविष्यात सदरील

इमारत कोसळून मोठी दुर्घटना होवू शकते एकंदरीत सदरील काम हे अंदाजपत्रका प्रमाणे होत नसल्याचे दिसून येत आहे या बाबत संबधीत कार्यालयास माहिती अधिकार २००५ अन् आम्हालाच करायचे आहे आणि कंत्राटदार हे आमच्या म्हणण्याप्रमाणे काम करीत आहे त्यामुळे तुम्हाला काय करायचे आहे ते आमच्या अधिकाऱ्यांना मान्य आहे मग तुम्हाला काय करायचे



? असा उलट प्रश्न संबधीत अधिकारी / कर्मचारी कार्यालयात चौकशी केली असता उत्तर देत आहेत.

मुळात शासकिय यंत्रणेचे काम आहे त्यामुळे अंदाजपत्रकाप्रमाणे होणे आवश्यक आहे परंतू प्रत्यक्षात तसे होत नाही. तसेच तालुक्यात या यंत्रणेकडे (एजन्सीकडे) १) मंठा शासकिय विश्राम गृह २) क्रीडा संकुल ३) पाटोदा उपकेंद्र या प्रकारचे अनेक कामे चालू आहेत तर काही कामे बनात्तट रोकॉर्ड करुन पूर्ण देखील केली आहेत. ज्यामध्ये मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह २) मॉर्डन इंग्लीस स्कुल (इमारत) या सारखे अनेक कामे कलरिंग करुन पूर्ण केलेल्या आहेत. ज्या भविष्यात धोकायदायक होवू शकतात

या बाबत संबधीत यंत्रणेला संबधीत अधिकारी व कर्मचारी हेच जबाबदार आहेत असे म्हणणे वावगे ठरणार नाही कारण एजन्सीवर **पान २ वर**

### युवा आदर्श

### मेरी क्रिसमस...

येशू ख्रिस्त जन्मदिन
उत्सव पर्वणी ख्रिस्ता
मेरी क्रिसमस बोला
शुभेच्छा सकला देता
सिध्द आनंद उत्साह
नव वर्षाच्या स्वागता
मसिहा संदेश जाणा
स्नेह भाव द्या जगता
अद्भुत कल्पना न्यारी
मध्यरात्री येईलं सांता
भेट वस्तु भरभरूनि
वाटणारं सुहास्ये दाता
अंकुश ठेवेलं मनावर
तो सार्थ जगत् ज्येता
सद्गुण करे विकसित
हो मार्ग दर्शक विनेता
मनाची ऐश्वर्य संपन्नता
मानवा बनवी सचेता
सार्थकी होई आयुष्य
येशू शिकवण कळता
बायबल पठन चिंतन
जाणे जीवन वृतांता
येशू विचारा आचरण
सिध्द करी सिध्दांता

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

**झाडे लावा**
**झाडे जगवा**

## १२ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई -** राज्य सरकारने १२ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या असून, उद्योग विभागाच्या सचिवपदी डॉ. पी. अनबलगन तर 'बेस्ट'च्या महाव्यवस्थापकपदी डॉ. हर्षदीप कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
'बेस्ट'चे महाव्यवस्थापक अनिल डिग्गीकर यांची दिव्यांग कल्याण विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदी बदली करण्यात आली आहे. डॉ. बी. राधाकृष्णन यांची 'महाजेनको' या वीज कंपनीच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर संजय दैने (वस्त्रोद्योग आयुक्त, नागपूर), राहुल कर्डिले (नाशिक महानगरपालिका आयुक्त), सी. वनमती (जिल्हाधिकारी वर्धा), संजय पवार (सहआयुक्त विक्रीकर विभाग), अविशंत पंडा (गडचिरोली जिल्हाधिकारी), विवेक जॉनसन (मुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रपूर जिल्हा परिषद), अण्णासाहेब चव्हाण (मुख्य कार्यकारी अधिकारी, महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजना, मुंबई), **पान २ वर**



**एकल प्लास्टिक वापर, वाहतुक, विक्री व साठा बंदी असून शहरात महानगर पालिकेकडुन अशा बंदी असलेल्या प्लास्टिक विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली. यावेळी जालना मनपाच्या सहायक आयुक्त श्रीमती सुप्रिया चव्हाण, स्वच्छता विभाग प्रमुख पंडीत पवार, स्वच्छता निरीक्षक अशोक लोंढे, शोएब खान, अरुण वानखेडे व इतर कर्मचारी उपस्थित होते.**






## संपादकीय पान

# नेतृत्व, कर्तृत्व, वक्तृत्व यांचा सुरेख संगम

कवी मनाचे, प्रखर राष्ट्रवादी अशी प्रतिमा असणारे भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची आज जयंती. २५ डिसेंबर १९२४ रोजी जन्मलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांनी कानपूरमधून राज्यशास्त्रात एम ए ची पदवी मिळवली. पदवी मिळविल्यानंतर वाजपेयी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते बनले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम करता करता त्यांनी पत्रकारिताही केली. राष्ट्रधर्म, पांचजन्य आणि वीर अर्जुन या नियतकालिकांसाठी त्यांनी पत्रकारिता केली. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात भाग घेऊन त्यांनी राजकीय कारकीर्द सुरू केली. श्याम ाप्रसाद मुखर्जी यांनी १९५१ साली जनसंघांची स्थापना केली. जनसंघाच्या स्थापनेत श्यामाप्रसाद मूखर्जी इतकाच अटलबिहारी वाजपेयी यांचाही वाटा आहे. १९५७ साली पहिल्यांदा ते जनसंघाच्या तिकिटावर लोकसभेत पोहचले. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांनी त्यांनी लोकसभेत ठसा उमटवला. त्यांचे भाषण ऐकण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू आवर्जून लोकसभेत उपस्थित राहत. पंडित जवाहरलाल नेहरु अटलजींच्या वक्तृत्वाने मोहित झाले होते. अटलबिहारी वाजपेयी एकदिवस भारताचे पंतप्रधान बनतील असे भविष्य त्यांनी वर्तवले होते. अटलबिहारी वाजपेयी सलग ९ वेळा लोकसभेवर निवडून गेले होते. १९६८ साली ते जनसंघाचे अध्यक्ष बनले. पक्षाध्यक्ष या नात्याने जनसंघ घरोघरी पोहचवण्याचे काम त्यांनी केले. त्याचवेळी विरोधी पक्षाची भूमिकाही त्यांनी तितक्याच प्रभावीपणे बजावली. १९७५ साली पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली. या आणीबाणीला त्यांनी प्रखर विरोध केला. आणीबाणीला विरोध केला म्हणून त्यांना दोन वर्षाचा कारावास भोगावा लागला. आणीबाणी उठल्यानंतर इंदिरा गांधी यांना पदावरुन हटवण्यासाठी सर्व विरोधी पक्ष एकत्र येऊन त्यांनी जनता पार्टी नावाचा पक्ष स्थापन केला. अटलबिहारी वाजपेयी यांनीही आपला जनसंघ हा पक्ष जनता पार्टीमध्ये विलीन केला. पण अवघ्या तीन वर्षात १९८० साली त्यांनी मुंबईत भारतीय जनता पार्टीची घोषणा केली. मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात अटलजी परराष्ट्रमंत्री होते. परराष्ट्रमंत्री या नात्याने त्यांनी इतर देशांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. परराष्ट्रमंत्री म्हणून संयुक्त राष्ट्र संघात त्यांनी हिंदीतून भाषण केले. संयुक्त राष्ट्र संघात हिंदीतून भाषण करणारे ते पहिले नेते होते. १९९६ साली ते पहिल्यांदा पंतप्रधान बनले पण लोकसभेत बहुमत सिद्ध न करता आल्याने अवघ्या तेरा दिवसांतच त्यांचे सरकार पडले. त्यानंतर १९९८ साली ते पुन्हा पंतप्रधान बनले यावेळी मात्र त्यांचे सरकार तेरा महिने टिकले. पण या तेरा महिन्यात त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता त्यांनी अणुस्फोट करून आपले सामाजिक व वैज्ञानिक श्रेष्ठत्व सिद्ध केले. ते पंतप्रधान असतानाच भारताने कारगिल युद्ध जिंकले होते. जय जवान, जय किसान, जय विज्ञान ही घोषणा त्यांनी दिली. १९९९ साली तिसऱ्यांदा ते पंतप्रधान बनले. यावेळी मात्र त्यांचे सरकार पाच वर्ष टिकले. सलग पाच वर्ष पंतप्रधान राहिलेले ते पहिले बिगर काँग्रेसी पंतप्रधान होते. अटलबिहारी वाजपेयी हे उत्कृष्ट कवी होते त्यांच्या सर्व कविता लोकप्रिय झाल्या त्यातील आओ फिरसे दिया जलाये.... ही कविता लोकांना खूप आवडली. त्यांनी सुमारे ४० पुस्तकांचे लेखन केले. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कार त्यांना अनेकवेळा मिळाला. सरकारने त्यांना पद्मविभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले. भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार त्यांना म रणोत्तर प्रदान करण्यात आला. नेतृत्व, कर्तृत्व आणि वक्तृत्व यांचा सुरेख संगम असलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांचे १६ ऑगस्ट २०१८ रोजी निधन झाले. अटलबिहारी वाजपेयी यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### पान १ वरुन

## शासकीय विश्रामगृहाचे ...


सार्वजनिक बांधकाम करणाऱ्या कार्यालयाचे नियंत्रण असते त्यामुळे कुंपनच शेत खात असल्यामुळे न्याय कोणाकडे मागायचा ? वरील प्रमाणे चालू असलेल्या कामाची अर्जदार यांच्या प्रत्यक्ष अंदाजपत्रका प्रमाणे प्रत्यक्ष जायमोक्यावर जावून स्थळ पंचनामा करण्यात यावा व जो पर्यत काम दर्जात्मक होत नाही तो पर्यत सदरील काम थांबविण्यात यावे नसता सदरील यंत्रणेचा परवाना रद्द करुन त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही या प्रकरणातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांना निलंबीत करण्यात यावे नसता लोकशाही मार्गाने सदरील मागणी करीता आपल्या कार्यालया समोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला असून निवेदन प्रतिलिपी मा. ना. श्री देवेद्रजी फडणवीस मुख्यमंत्री म.रा. मंत्रालय मुंबई,मा.ना.श्री एकनाथजी शिंदे साहेब उपमुख्यमंत्री म.रा. मंत्रालय मुंबई,मा. ना. श्री अजितदादा पवार साहेब उपमुख्यमंत्री म.रा. मंत्रालय मुंबई,मा. जिल्हाधिकारी साहेब, जालना,अभियंता सा.बां. विभाग जालना मा. उपविभागीय अभियंता सा.बा मंठा यांना दिले आहे.

## १२ सनदी ...

गोपीचंद कदम (मुख्य कार्यकारी अधिकारी, सोलापूर स्मार्ट सिटी) आदींची नियुक्ती करण्यात आली आहे.

# गाईला राजमातेचा दर्जा असतांना होणारी कत्तल थांबली नाही तर पोलीस अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करणार - आ. बबनराव लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी** - परतूर नगर परिषदेंतर्गत मोठ्या प्रमाणात गाईंची कत्तल केली जात असल्याच्या वारंवार तक्रारी येत असून संपूर्ण देशभरात गाईला राजमातेचा दर्जा असताना परतूर शहरात गायीची होणारी कत्तल थांबली नाही तर पोलीस अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई लागेल पोलीस यंत्रणेने गाईंच्या कत्तली संदर्भात कठोर भूमिका घेत शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करणे अपेक्षित आहे असे असताना गोवंश हत्या बंदीचा कायदा असताना देखील पोलिसांकडून कुठलीही दखल घेतली जात नाही किंवा या संदर्भात कत्तल




करणाऱ्या दोषींवर कुठलीही कठोर कारवाई केली जात नाही असे निदर्शनास यत असल्याने जर पोलिसांनी याबाबत कठोर भूमिका घेतली नाही तर लोकप्रतिनिधी म्हणून मुख्यमंत्री तथा गृहमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार करून संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याची शिफारस करावी लागेल असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज केले.

तहसील कार्यालय परतूर येथे आयोजित विविध विकास कामांच्या आढावा बैठकीदरम्यान आमदार बबनराव लोणीकर बोलत होते यावेळी पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, शहरातील अतिक्रमण रस्त्यावर लागणारे गाडी यामुळे रहदारीला मोठा अडचणी निर्माण होत असून याबाबत अनेक नागरिकांनी वारंवार तक्रारी केलेल्या आहेत. प्रशासनाने या तक्रारींची तात्काळ दखल घेणे अपेक्षित आहे परंतु म ुजोरी करणारी अधिकारी यासंदर्भात कुठलीही दखल घेत नाहीत असे निदर्शनास आले आहे. याउलट रहदारीस अडथळा निर्माण करणाऱ्यांना अधिकाऱ्यांकडून पाठबळ दिले जात असल्याचे देखील बोलले जात आहे त्यामुळे असा गैरप्रकार करणारे अधिकाऱ्यांची कुठलीही गयी केली जाणार नाही अशा कडक शब्दात आमदार बबनराव लोणीकर यांनी नगरपालिका प्रशासनाला सुनावले

मागील पंचवार्षिक मध्ये पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री पदावर कार्यरत असताना आपण स्वतः परतूर नगर परिषदेसाठी ४५ कोटी रुपये निधी मंजूर करत घनकचरा प्रकल्पाला मंजुरी देण्यात आलेली होती. या प्रकल्पाच्या माध्यम ातून परतुर शहरातील सांडपाणी व्यवस्थापन केले जाणार होते परंतु नगरपालिकेच्या तत्कालीन अध्यक्ष व प्रशासनाने बोगस एजन्सीची नेमणूक करून या सर्व प्रकारांमध्ये हलगर्जी व अपहर केल्याचे निदर्शनास येत आहे या सर्व बाबींची आपण गंभीरतेने दखल घेतली असून या संदर्भात नगर विकास मंत्र्याकडे तक्रार करत चौकशी करण्याचे आदेश लवकरच काढले जातील त्याचप्रमाणे सदरील घनकचरा प्रकल्प का पूर्ण होऊ शकला नाही असा प्रश्न उपस्थित अधिकाऱ्यांना केला असता कोणालाही उत्तर देता आले नाही यावरून आमदार बबनराव लोणीकर यांनी नगरपरिषद प्रशासनाला खडसावले.

परतूर नगरपरिषद अंतर्गत कार्यरत असलेल्या ४८ स्वच्छता कर्मचाऱ्यांना सेवेत कायम आपण स्वतः प्रयत्न करणार असून निश्चितपणे या सर्व बाबी संदर्भात मी कर्मचाऱ्यांच्या बाजूने आहे असे मत आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केले तसेच, नगरपालिका प्रशासनाच्या वतीने लोकप्रतिनिधींचा मान सन्मान राखला जात नाही अशा देखील वारंवार तक्रारी लोकप्रतिनिधीं मार्फत केल्या जात आहेत हे अत्यंत गंभीर बाब असून शेकडो लोकांनी प्रभाग विकासाच्या उद्देशाने संबंधितांना निवडून देत नगर परिषदेमध्ये लोकप्रतिनिधी म्हणून पाठवलेले असताना अशा सर्व लोकप्रतिनिधींचा मानसन्मान करावा लागेल, प्रत्येक विभागाचे काम चोख करावं लागेल परंतु असे होताना दिसत नाही त्यामुळे नगरपरिषदेच्या कुठल्याही अधिकाऱ्याने राजकारण न करता सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींचा मानसन्मान करण्यापेक्षा आहे असे न केल्यास याची गंभीर परिणाम भोगावे लागतील असा इशारा देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी दिला.

परतूर नगर परिषदेला आतापर्यंत नव्याने २८ ट्रान्सफॉर्मर आणि ३०० पोल दिले आहेत असे असले तरी अद्याप पर्यंत कुठलीही जोडणी करण्यात आली नाही. संपूर्ण परतुर शहरांमध्ये लाईटच्या तारा सगळीकडे लटकलेले असून त्यामुळे जीवित हानी होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही त्यामुळे या बाबीची गंभीर दखल घेत वीज वितरण प्रशासनाने तात्काळ या संदर्भात उचित कारवाई करण्या अपेक्षित आहे असे असताना वीज वितरण चे अधिकारी व कर्मचारी परतु शहरात लटकलेल्या तारा संदर्भात अद्याप पर्यंत अजिबात गंभीर नाहीत असेच दिसून येते त्यामुळे वीज वितरण अधिकारी व कर्मचारी एखाद्या व्यक्तीचा जीव गेल्यानंतर या ठिकाणी शब्दात आमदार बबनराव लोणीकर यांनी वीज वितरण विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना झापले

संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना मानधन स्वरूपात २ कोटी ५० लाख रुपये मंजूर करण्यात आले असून या योजनेअंतर्गत श्रावण बाळ विधवा परित्यक्ता दिव्यांग दुर्धर आजार ग्रस्त बांधवांना मानधन उपलब्ध करून देण्यात आले असून या माध्यम ातून गोरगरीब दिन दलित काबाडकष्ट करणाऱ्या अनेक महिला व पुरुषांना या मानधनाच्या रूपाने छोटी खाली मदत केली जाणार आहे अशी माहिती देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी दिली. या योजनेअंतर्गत आतापर्यंतच्या लाभार्थ्यांना लाभ मिळालेला नाही अशा पात्र लाभार्थ्यांना तात्काळ लाभ देत पुन्हा एकदा बैठकीच्या आयोजन करण्यात यावे अशी सूचना देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी परतुर तहसीलदार यांना केली.

परतूर नगरपरिषदे अंतर्गत गुंठेवारीचा प्रश्न ऐरणीवर आला असून लोकप्रतिनिधींनी नगरपरिषद प्रशासनावर प्रचंड नाराजी व्यक्त केले आमदार बबनराव लोणीकर यांनी आयोजित केलेल्या आढावा बैठकीदरम्यान नगरसेवक व्यापारी गावातील प्रतिष्ठित नागरिक या सर्वांनी नगरपालिका प्रशासनावर रोष व्यक्त करत हेतूपुरस्सर टाळाटाळ केली जात असल्याची वेदना आमदार बबनराव लोणीकर यांच्यासमोर म ांडली. यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी गुंठेवारी कायद्यासंदर्भात संबंधित तहसीलदार व मुख्याधिकारी नगरपरिषद परतुर यांना सूचना केली गुंठेवारी नोंदणी करण्यासंदर्भात आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रशासनाला सूचना देत लवकरात लवकर हा प्रश्न मार्गी लागावा यासाठी कठोर शब्दात सूचना केली

परतूर येथील महाराणा प्रताप चौक - म ांगिर बाबा चौक येथे कचऱ्याची विल्हेवाट लावणे आवश्यक असल्याची बाब तसेच बेवारस जनावरे इतरत्र फिरत असल्याने त्याचा वाहतुकीला होणारा त्रास लक्षात घेता आणि रस्त्यात पडलेल्या काचेच्या वस्तू किंवा प्लास्टिक खाल्ल्याने जनावरांना होणारा त्रास नगरपालिका प्रशासनाने लक्ष देणे अपेक्षित आहे अशी सूचना देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली.

परतूर पारधीवाडा येथे आतापर्यंत कुठली भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली नसल्याचे बाब लोकप्रतिनिधी व प्रतिष्ठित नागरिकांनी उपस्थित केल्यानंतर या ठिकाणी भौतिक सुविधा बरोबरच शबरी योजना अंतर्गत घरकुल समाज मंदिर किंवा सार्वजनिक शौचालय देखील उपलब्ध करण्यात आलेले नसल्याची बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर या संदर्भात तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश आमदार बबनराव लोणीकर यांनी पालिका प्रशासनाला दिले. पारधी वडा परिसराला वीर बिरसा मुंडा नगर नाव देण्याचा प्रस्ताव व ठराव नगरपालिका प्रशासन घेतलेला असून अध्यापर्यंत त्या संदर्भात कुठली कार्यवाही करण्यात आलेली नाही त्याम ुळे मोठ्या प्रमाणात महापुरुषांची अवहेलना केली जात असल्याची भावनांमध्ये आहे त्यामुळे या संदर्भात तात्काळ कार्य करण्याची सूचना देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली

उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मुख्याधिकारी यांना सोबत घेऊन नगरपालिकेने बांधलेल्या बोगस घरांची पाहणी करणार असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी आढावा बैठकीदरम्यान स्पष्ट केले. शहर किंवा ग्रामीण भागातील अनधिकृत बांधण्यात आलेल्या घरांना अधिकृत करण्यासंदर्भात कायदेशीर कारवाई करणार असल्याचे देखील लोणीकरांनी स्पष्ट केले. परतूर शहरात बोगस बांधण्यात आलेल्या घरकुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करून पाडण्याची परवानगी मागा अशी सूचना देखील आमदार लोणीकरांनी नगरपरिषद प्रशासनाला केली. रेल्वे भरण्याची मागणी केली असता या ठिकाणी बस स्थानक उभारण्यासाठी नगरपालिकेने प्रस्ताव तयार करून पाठवावा आपण शासन दरबारी हा विषय मांडून निश्चितपणे मिनी बस स्थानकाचा विषय मार्गी लाव असा शब्द एवढे आमदार बबनराव लोणीकर यांनी दिला

यावेळी तहसीलदार प्रतिभा गोरे तहसीलदार सोनाली जोंधळे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री मिठेवाड वाघमारे उपविभागीय कृषी अधिकारी श्री रोडगे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे कार्यकारी अभियंता श्री चव्हाण उपकार्यकारी अभियंता श्री गायकवाड श्री लांडगे, जलसंधारणचे कार्यकारी अभियंता श्री वाघमारे निम्न दुधना प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंता श्रीमती कोरके गटविकास अधिकारी श्री तांगडे गटविकास अधिकारी जालना श्री पवार सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा परिषद जिल्हा परिषदच कार्यकारी अभियंता श्रीमती सलगर उप अभियंता श्री सुगंधे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे अभियंता श्री मस्के यांच्यासह तालुकाध्यक्ष श्री शत्रुघ्न कणसे युवा मोर्चा जालना जिल्हाध्यक्ष संपत टकले संदीप बाहेकर प्रकाश चव्हाण कृष्ण आरगडे प्रवीण सातोणकर तुकाराम सोळंके बंडू मानवतकर बंकट नाना सोळंके बबलू सातपुते दिगंबर मुजमुले अशोकराव बरकुले पिंटू काका ढवळे रंगनाथ येवले मधुकर मोरे विश्वंभर शेळके हनुम ान चिखले रामप्रसाद गिरी नरेश कांबळे मलिक कुरेशी मुजू कायमखानी यांच्यासह अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीचे दहन का केले होते?

आपण सर्वांना ज्ञात आहे की, इतिहासात २५ डिसेंबर १९२७ ला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ते यासाठी की, २५ डिसेंबर १९२२७ ला पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म नुस्मृतीच्या दहनाचा कृती कार्यक्रम घडवून आणला होता. अशा प्रकारची एका ग्रंथ वेड्या पुस्तक प्रेमी व्यक्तींने टोकाची भूमिका का पार पाडली असावी? असा प्रश्न आपल्या समोर आ वासून अनुत्तरित राहतो, म्हणून हे दोन शब्द लेखणीबद्ध करण्याचा हा त्रोटक प्रयत्न आहे.

माणवीय समाजात प्रत्येक व्यक्तीने माणुसकीच्या दृष्टीकोनातून इतर व्यक्तींशी व्यक्तीप्रमाणे वागणे अपेक्षित आहे. मात्र भारतीय सम ाजजीवनातील व्यक्ती तसे करताना दिसत नाहीत. उलटपक्षी समाज नियंत्रित करणा-यांनी अमानवीय दृष्टीकोनातून समाजाचे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशा चार वर्णात शास्त्रपरत्वे विभाजन केले तर रुढीपरत्वे अतिशूद्राची भर घालून पाच वर्णात विभाजन केल्याने आपापसांतील सहवासाला मर्यादा आल्या होत्या. मनुस्मृतीप्रमाणे वर्णव्यवस्थेत या सर्वांचा दर्जा असम ान, विषम असल्याने उच्च दर्जा असणारे निम्न दर्जा असणाऱ्यांवर अत्याचार करण्याचा जन्मसिद्ध अधिकार प्राप्त झाल्याप्रमाणे वागत असतात. याची अंमलबजावणी व्हावी म्हणून त्यांच्यावर बेटी बंदी, रोटी बंदी, लोटी बंदी व भेटी बंदी घालण्यात आली आहे. यातील बंधन ज्यांना लागू पडत नाही, असा वर्ग म्हणजे ब्राह्मण वर्ग होय. जे स्वत:ला सर्वश्रेष्ठ समजतात. ज्यामुळे समाज असमानतेच्या विळख्यात जखडून राहिल्याने मानवीय दृष्टीकोनातून विकसित होऊ शकला नाही. परिणामी महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह घडवून आणण्याची योजना आखण्यात आली होती. ती केवळ पाणी पिऊन तहान भागविण्यासाठी नव्हे! तर इतरांप्रमाणे आम्हीही म ाणसे आहोत हे सिद्ध करून समतेची मुहूर्तमेढ रोवण्यासाठी या सभेचे आयोजन होते. अशाप्रकारची सभा यापूर्वी कुठे भरविण्यात आली होती काय? याचा शोध घेतला तर २४५ वर्षापूर्वी २४ जानेवारी १७८९ ला युरोप खंडातील फ्रान्स मध्ये तेथील १६ व्या लुई राजाने एक पत्र काढून ५ मे १७८९ ला व्हर्साय ला जनतेच्या प्रतिनिधींची सभा बोलावली होती. त्याला इतिहासात फ्रेंच राज्यक्रांती असे म्हणतात.

त्या काळात सुद्धा फ्रान्स मध्ये वर्णव्यवस्था अस्तित्वात होती. मात्र तिथे त्रैवर्णिक व्यवस्था होती. ज्यात वैश्य, शूद्र व अतिशूद्र अशी विभागणी तिथे नव्हती. परंतु या सर्वांसाठी एकच वर्ण होता. अशाप्रकारे फ्रान्स मधील व भारतातील हिंदू समाजात वर्णाश्रमव्यवस्था समान होती. त्या काळात फ्रेंच लोकांच्या विकासासाठी त्यांना त्यांच्यात राजकीय, सामाजिक व धार्मिक अशा प्रकारचे संघटन निर्माण करावयाचे होते. महाड सत्याग्रहातून आपणास मात्र सामाजिक व धार्मिक स्तरावर जनतेचे संघटन करणे अपेक्षित होते. याचा विचार करता फ्रेंच लोकांनी या अनुषंगाने काय भूमिका पार पाडली? याचा विचार करणे संयुक्तिक ठरेल. तर त्यांनी १७ जून १७८९ ला पहिला जाहिरनामा काढला त्यानुसार त्रैवर्णिक व्यवस्थेचे उच्चाटन करून एकजिनसी मानवीय दृष्टीकोनातून समाज निर्माण करण्याचे ठरविण्यात आले. पुढे दुसऱ्या जाहीरनाम्याप्रम ाणे धर्मोपदेशक निवडण्याचे पोपचे अधिकार काढून धर्माधिकारी वर्गाचे स्वयंभूपण नाहिसे करण्यात आले. तिसरा जाहिरनामा हा तेथील राजकीय, आर्थिक व धार्मिक




व्यवस्थेशी संबंधित होता ज्याचे दूरगामी परिणाम जागतिक स्तरावर झाले. या जाहीरनाम्याची एकंदरीत १७ कलमे होती. ज्यात स्वातंत्र्य, सम ता, मित्रता व न्याय अंतर्भूत होते. अशाप्रकारे फ्रेंच सभेची क्रांतिकारक प्रतिमा आपल्या डोळ्यासमोर उभी ठेवून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आपण वर्णव्यवस्था उध्वस्त करून एकजिनसी मानवीय समाज निर्माण करण्यासाठी हिंदूचे संघटन तयार केले पाहिजे. करिता छोटा उद्देश ठेवणे हा गुन्हा आहे. (डुं ळा खी ऊीळाश.) करिता आपण उच्च कोटीचे ध्येय डोळ्यासम ोर ठेवून कार्यरत राहिले पाहिजे. तसेच कुठल्याही रोगाची रोगपरिक्षा नीट केली तर योग्य औषधोपचार करून तो आजार लवकरात लवकर बरे करता येईल. अन्यथा अंदाजे केलेल्या उपाय योजनांनी आजाराची तीव्रता वाढून केवळ कालावधी वाढत जाईल. (खष ींहश वळीशरीश ळी पीं ीळसहींश्रू वळरसपीशव ींहश ीशाशवू ुळश्रश्र लश ीशश्रशीीी रपव ींहश लीीश ाू लश ीीीपिशव.) असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या प्रसंगी स्पष्ट केले होते. त्याचे मर्म समजून घेणे क्रमप्राप्त आहे.

अशाप्रकारे पहिल्या दिवसाच्या कार्यवाहीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण संपल्यावर हिंदू व्यक्तीच्या जन्मसिद्ध हक्काच्या जाहिरनाम्यात एकूण चार ठराव म ांडण्यात आले. ज्यात पहिल्या ठरावात सहा उपठराव होते. याप्रमाणे श्रुती, स्मृती व पुराणे वगैरे अवैज्ञानिक ग्रंथप्रामाण्य नाकारण्यात आले होते. म्हणून शूद्र जातीचा उपमर्द करणारी, प्रगती खुंटविणारी, आत्मबल नष्ट करून सामाजिक, राजकीय व आर्थिक गुलामगिरी कायम करणारी वचने ध्यानात घेऊन हिंदू मात्राच्या जन्मसिद्ध हक्काच्या जाहिरनाम्यात गोवलेल्या तत्वांशी तुलना करून मनुस्मृती हा ग्रंथ 'धर्मग्रंथ' या पवित्र नावास शोभण्यास अपात्र असल्याचे एकमत त्या परिषदेचे झाल्याने ते व्यक्त करण्यासाठी असल्या लोकविग्रही व माणूसकिचा उच्छेद करणा-यां धर्मग्रंथाचा दफनविधी करीत आहे. असा ठराव क्रमांक दोन रा. गंगाधर नीळकंठ सहस्रबुद्धे यांनी मांडला होता ज्याला रा. राजभोज यांनी अनुमोदन दिले तर रा. थोरात यांनी पुष्टी केली.

या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी सत्याग्रह सभेतील म नुस्मृतीची दहनभूमी तयार करायला सहा कारागीर दोन दिवस खपत होते. सहा इंच खोल व सुमारे दीड फ ूट चौरस खड्डा खणून तो चंदनाच्या लाकडांनी भरून काढला होता. चार फूट उंचीचे चार खांब चार कोनावर उभे केले होते. 'मनुस्मृतीची दहनभूमी', 'अस्पृश्यता नष्ट करा', व 'भिक्षुकशाहिला गाडून टाका' अशा पताका तीन बाजूंनी लावल्या होत्या. २५ डिसेंबर १९२७ ला रात्री ९ वाजता बापुसाहेब सहस्त्रबुद्धे व पाच सहा अस्पृश्य साधू यांच्या या दहनभूमीवर मनुस्मृतीचे पुस्तक ठेवून ते जाळण्यात आले.

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हा मनुस्मृती दहनाचा प्रत्यक्ष कृती कार्यक्रम घडवून आणला आहे. तरी आपल्या पक्ष, संघटना, संस्था आणि आपण अनुयायी म्हणून या अनिष्ट विचारांचा आपल्या आचरणातून नायनाट केला आहे काय? हा प्रश्न अनुत्तरित राहतो. त्याची समर्पक उत्तरे शोधून मार्गक्रमण करणे ही आपली सर्वांचीच जबाबदारी आणि कर्तव्य आहे. अशी अपेक्षा बाळगून मी माझ्या शब्दाला येथे तूर्तास विराम देतो.

जय भीम! जय पिपल्स व्हाईस!!
जय भारताचे संविधान!!!

**बी. बी. मेश्राम, नॅशनल कौन्सिल ऑफ दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना), संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र.**
**संपर्क : ९४२१६७८६२८**
stdbbmgmail.com

# दैनंदिन व्यवहारासाठी डिजिटल व्यवहाराचा मोठ्या प्रमाणात वापर - जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ

**जालना । प्रतिनिधी -** डिजिटल व्यवहार हा आता आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग झाला असुन त्याचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. डिजिटल तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे सर्व प्रकारचे व्यवहार सोपे झाले असतानाच याच तंत्रज्ञानाचा वापर करून ग्राहकांच्या फसवणुकीचे प्रकारही वाढले असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ म्हणाले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे राष्ट्रीय ग्राहक दिनाचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ बोलत होते. यावेळी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या अध्यक्ष श्रीमती अपर्णा काटे, वरिष्ठ न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव श्रीमती प्रणिता भारसाकडे-वाघ, जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती सविता चौधर, तहसिलदार श्रीमती छाया पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ. पांचाळ पुढे म्हणाले की, आजचे युग हे डिजिटल युग असुन, वेळेची आणि पैशाची बचत करण्यासाठी प्रत्येक जण आज डिजिटल व्यवहाराचा मोठ्या प्रमाणात वापर करत आहेत. परंतू डिजिटल व्यवहार करतांना फसवणूकीचे प्रकार वाढल्याने प्रत्येकाने सतर्क राहणे देखील आवश्यक आहे. ऑनलाईन किंवा डिजिटल व्यवहार करतांना अनोळखी लिंक किंवा ओटीपी बाबत सावध भूमिका घेणे आवश्यक आहे. तसेच फसवणूक झाल्यास ऑनलाईन तक्रार देखील नोंदविणे आवश्यक आहे. तसेच ग्राहकांना सुरक्षित डिजिटल व्यवहाराबद्दल जागरूकता देखील निर्माण करणे आवश्यक आहे.

श्रीमती अपर्णा काटे म्हणाल्या की, न्यायालयात लवकरच व्हर्च्युअल आभासी सुनावणी आणि ग्राहक न्यायासाठी डिजिटल सुविधा सुरु होणार आहे. यामुळे नागरिकांचा वेळ आणि पैसे या दोन्हीची बचत होणार आहे. व्हर्च्युअल सुनावणी सुरु होणार असल्याने नागरिकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे. ज्यामुळे या सुविधांचा सर्वांना वापर करणे सोयीचे होईल.




जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती सविता चौधर प्रास्ताविकात म्हणाल्या की, २४ डिसेंबर, १९८६ या दिवशी ग्राहक हक्क कायद्याला मंजुरी मिळाल्याने दरवर्षी २४ डिसेंबर हा दिवस 'राष्ट्रीय ग्राहक दिन' म्हणुन साजरा केला जातो. ग्राहक संरक्षण कायद्यामुळे प्रत्येक भारतीय ग्राहकाला हक्क प्राप्त झालेले आहेत.

यावेळी कार्यक्रमास जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे सदस्य आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# तालुकास्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत श्रीरामतांडा शाळा सर्वप्रथम मुख्याध्यापक व शिक्षकांचे सर्वत्र कौतुक



**मंठा । प्रतिनिधी -** जिल्हा परिषद शिक्षण विभाग जालना यांच्यामार्फत दरवर्षीप्रमाणे याही वर्षी प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते आज दिनांक २४/१२/२०२४ या दिवशी शाळा स्तर व केंद्रस्तरावरून निवड झालेल्या विद्यार्थ्यांची प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली.या स्पर्धेमध्ये इयत्ता १ ते ५ या गटातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा श्रीराम तांडा या शाळेने प्रथम क्रमांक मिळवत बाजी मारली आहे.

आजच्या तालुकास्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत मंठा तालुक्यातील बारा केंद्रातील बारा गटानी सहभाग घेतला होता.यामध्ये श्रीरामतांडा जिल्हा परिषद शाळा प्रथम क्रमांक मिळवूनअव्वल ठरली आहे. प्रश्नमंजुषा स्पर्धेत इयत्ता १ ते ५ गटातून श्रीरामतांडा शाळेतील आरव सरकटे,स्वराज निर्वळ, शिवम राठोड या विद्यार्थ्यांनी भाग घेऊन प्रथम क्रमांक मिळवला.

प्रश्नमंजुषा स्पर्धेतील यशाबद्दल विद्यार्थी व त्यांची तयारी करून घेणारे शाळेचे मुख्याध्यापक व वर्गशिक्षक श्री अविनाश लोमटे तसेच विषय शिक्षक श्रीकांत अंबुरे,सुनीता दुभळकर,अर्चना लांडगे व पूजा नागटिळक यांचे तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी विपुल भागवत, विस्तार अधिकारी के.जी राठोड, शिवाजी देशमुख, भाऊसाहेब जाधव सर, रामेश्वर शिंदे, विलास माथने,विषय तज्ञ संतोष गिर्हे, अभिमान बायस,ज्योती चव्हाण, विद्या पतंगे,रमेश कुडे, बोधने सर व सोनटक्के तसेच तालुक्यातील मुख्याध्यापक व शिक्षक यांनी अभिनंदन करून कौतुक केले.

# छत्रपती संभाजीनगर परीक्षेत्रीय पोलीस क्रिडा स्पर्धेत जालना पोलीस फुटबॉल संघ विजयी



**जालना । प्रतिनिधी -** येथे सुरु असलेल्या छत्रपती संभाजीनगर परीक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धा सुरु असून आज झालेल्या फुटबॉल स्पर्धेत जालना पोलीस फुटबॉल संघाने ६-0 गोल ने दणदणीत विजय मिळविला. दि.२४ डिसेंबर २०२४ संध्याकाळी ५ वाजता जालना पोलीस फुटबॉल संघ विरुद्ध बीड पोलीस फुटबॉल संघाचा सामना झाला. जालना पोलीस फुटबॉल संघ ६-0 गोल ने वियजी करण्यासाठी जालना पोलीस फुटबॉल संघातील फुटबॉल संघ कप्तान अमजद खान यांनी २ गोल, सुधारकर शेंडगे ३ गोल आणि प्रवीण खंदारे १ गोल असे उत्कृष्टरित्या ६ गोल करुन जालना पोलीस फुटबॉल संघ विजयी झाला आहे. जालना पोलिस फुटबॉल संघासाठी प्रशिक्षक म्हनुन बी. टी. मोरे, राजू राणा यांनी मार्गदर्शन केले आहे.

# दुचाकीला कारची धडक एकजण जागीच ठार

## राज्य महामार्गावरील अपघाताची मालिका थांबेना

**मंठा । प्रतिनिधी -** दुचाकीला कारची धडक रेखा सुरेश राठोड जागीच ठार तर अर्जुन लक्ष्मण चव्हाण गंभीर जखमी झाले आहे. जालना जिंतूर राज्य महामार्गावरील अपघाताची मालिका थांबता थांबेना रोज निष्पाप लोकांचा बळी जात आहे.



याविषयी सविस्तर वृत्त की (ता.२४) मंगळवार रोजी सकाळी ११ ते १२ केंधळीतांडा येथून आपल्या होंडाशाईन दुचाकीवरून क्रमांक एम एच २१ बी.ई ५४३ हे दोघेजण मंठा कडे येत असताना शहरापासून जवळच असलेल्या जालना जिंतूर राज्य महामार्गावरील केंधळी शिवारातील विजय पेट्रोल पंप समोर मागून येणाऱ्या ईरटीका कारने क्रमांक एम एच २८ व्ही ८७३६ ने दांपत्याला जोरदार धडक दिल्याने रेखा सुरेश राठोड वय वर्ष ३५ हे जागीच ठार झाल्या तर अर्जुन लक्ष्मण चव्हाण वय वर्ष ६0 गंभीर जखमी झाले असता आसता त्यांना तात्काळ मंठा येथील ग्रामीण रुग्णालयात त हलविण्यात आले.

# जालना जिल्हा स्त्री रुग्णालयात घोटाळा; आम आदमी पक्षाचा आरोप

## जिल्हा स्त्री रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना काही कारण सांगून दुसऱ्या खासगी रुग्णालयात रेफर केले जाते

**जालना । प्रतिनिधी -** जालन्याच्या जिल्हा स्त्री रुग्णालयात घोटाळा सुरू असल्याचं आम आदमी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे. जिल्हा स्त्री रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना काही कारण सांगून दुसऱ्या खासगी रुग्णालयात रेफर केलं जातं असा आरोप आपच्या कार्यकर्त्यांनी केलाय. या प्रकरणाची चौकशी करून जो या प्रकाराला दोषी असेल त्याच्यावर कारवाई करण्याची मागणी आपच्यां पदाधिकार्यांनी केलीय. जर जिल्हा रुग्णालयातून रुग्णांना रेफर करण्याचा प्रकार थांबला नाही तर आम आदमी पार्टी रस्त्यावर उतरून आंदोलन करेल असा इशारा देखील आपच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. जालन्यातील गांधी चमन परिसरात स्त्री रुग्णालय आत्ता रेफर रुग्णालय बनले. गोर गरिब व गरजू नागरिकांसाठी बाल व स्त्री रुग्णालय आहे. महिला रुग्ण जेव्हा रुग्णालयात उपचारासाठी भरती होतात तेव्हा डॉक्टर काहीं न काही कारणे सांगून चक्क खासगी रुग्णालयात रेफर करीत असल्याच प्रकार समोरं आलाय. मात्र गरीब रुग्ण यावर बोलण्यासाठी नकार देतायेत. गरिबाना खासगी रुग्णालयात ऊपचार घेण्यासाठी जवळ पैसे नसतात परंतु बाल व स्त्री रुग्णालयाकडुन रेफर केल्याने गरिबांना भुर्दंड सहन करावा लागतोय. प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची मागणी रुग्णांच्या वतीने होत आहे. स्त्री रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांना खासगी दवाखान्यात रेफर करून महिन्याकाठी



लाखो रुपयाचा घोटाळा करीत असल्याचा आरोप आम आदमी पार्टीचे फेरोज बागवान यांनी केलाय. ते आज दि.२२ रविवार रोजी दुपारी दोन वा. च्या सुमारास स्त्री रुग्णालय येथे माध्यमांशी बोलत होते.या प्रकरणी अधीक्षक यांनी लक्ष घालून चौकशी करावी अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा देखील फेरोज बागवान यांनी दिला आहे. यावेळी संजोग हिवाळे, जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी जालना यांची उपस्थिती होती.

# सोमवारी जालना येथे प्लेसमेंट ड्राईव्ह जागेवर निवड संधीचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील नोकरीच्या शोधात असलेल्या युवक-युवतींना विविध खासगी कंपन्या, कारखाने, उद्योग-व्यवसाय आणि आस्थापना यांचेकडील रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याच्या उद्देशाने रोजगार सहाय्यासाठी विशेष मोहिम सुरू करण्यात आली आहे. याप्रमाणे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर जालना यांच्यामार्फत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना येथे सोमवार दि. ३० डिसेंबर, २०२४ सकाळी ११ ते २ वाजेपर्यंत प्लेसमेंट ड्राईव्ह-जागेवर निवड संधी आयोजित करण्यात आली आहे. जालना जिल्ह्यातील नोकरी इच्छुकांनी या संधीचा लाभ व अधिक माहिती घेण्यासाठी विभागाच्या ु.ीक्षसरी.ारहरिुरूरा.सीं.ळप या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

भूमी कॉटेक्स प्रा.लिमिटेड जालना यांची पदवी उत्तीर्ण करिता सुपरवायझर पदासाठीचे 0४ पदे, तसेच लेखा विषयक अनुभव असलेल्या बी.कॉम उत्तीर्ण करिता लेखापाल करिता 0३ पदे, आय.टी. आय इलेक्ट्रिशियन उत्तीर्ण करिता 0६ पदे, कोणतीही पदवीधर उत्तीर्ण करिता वजन काटा ऑपरेटर साठी १ पद, आय.टी.आय फिटर उत्तीर्ण करिता ३ पदे, बारावी उत्तीर्ण करिता मशीन हेल्परची ३ पदे तसेच बी.कॉम पदवी उत्तीर्ण करिता डाटा एन्ट्री ऑपरेटर ची २ अशी एकूण २२ रिक्त पदे प्राप्त झालेली आहेत. नोकरी इच्छुक पात्रताधारक उपस्थित होणा-या उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येवून जागेवरच निवडीची संधी उपलब्ध आहे. जालना जिल्ह्यातील नोकरी इच्छुकांनी या संधीचा लाभ व अधिक माहिती घेण्यासाठी विभागाच्या www.rojgar.mahaswayam.gov.in या वेबसाईटला भेट द्यावी. यापूर्वी नोंदणी केली नसल्यास प्रथम आपली नोंदणी करावी आणि होम पेज वरील नोकरी साधक लॉगिन मधून आपल्या युजर आयडी व पासवर्ड च्या आधारे लॉगिन करावे. त्यानंतर डॅसबोर्ड मधील पडित दीनदयाळ उपाध्याय जॉब फेअर या बटनावर क्लिक करून जालना जिल्हा निवडून त्यातील प्लेसमेंट ड्राईव्ह 0४ याची निवड करावी. उद्योजक, नियोक्तानिहाय त्यांच्याकडील रिक्त पदांची माहिती घ्यावी. याप्रमाणे आवश्यक किमान पात्रता धारण करीत असल्याची खात्री करून उपलब्ध असलेल्या रिक्त पदासाठी ऑनलाईन पद्धतीने आपला पसंती क्रमांक नोंदवावा आणि किमान दोन प्रतीत बायोडाटासह फोटो,शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता आदि कागदपत्रे कंपनींना देण्यासाठी छायांकित प्रती संच सोबत ठेवून सोमवार दि. ३0 डिसेंबर,२0२४ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत प्रत्यक्ष मुलाखतीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर, प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, जालना येथे उपस्थित राहून या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये सहभागी व्हावे आणि रोजगाराच्या या पर्वणीचा निश्चित लाभ घ्यावा. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# जैन कलार प्रीमीयर लीग टुर्नामेंट-२०२५ करीता संघ घोषित

समाजातील संपूर्ण युवा वर्ग एकत्र यावा व नव्याने उर्जा निर्माण व्हावी या उद्देशाने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी समाजातर्फे प्रीमियर लीग टुर्नामेंटचे आयोजन करण्यात येत आहे.दिनांक ७ जानेवारी ते १२ जानेवारी २०२५ पर्यंत चालणाऱ्या प्रीमियर लीग सिझन - ७ टुर्नामेंट करीता संघ घोषित करण्याकरिता संपूर्ण खेळाडूंची सभा दिनांक २२ डिसेंबर २०२४ ला जैन कलार समाज सांस्कृतिक भवन, नागपूर येथे आयोजित करण्यात आली होती.यामध्ये वेगवेगळ्या संघाने आपली नोंद करून हजेरी लावली. अशाप्रकारे ७ जानेवारी पासून सुरू होत असलेल्या विदर्भातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील १५ संघानी आपली नोंद करून खेळाडूंमध्ये नवीन ऊर्जा निर्माण करून आपआपल्या संघाची घोषणा केली.या टुर्नामेंटच्या संपूर्ण मॅचेस ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालय, क्रीडा चौक, हनुमान नगर, नागपूर येथे आयोजित केल्या असून सकाळी ९.00 ते सायंकाळी ४.00 वाजेपर्यंत खेळल्या जाईल.या सभेला संघ प्रमुख, आयोजक, खेळाडूंसह अनेक मान्यवर व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.या सभेचे सुत्र संचालन राकेश मासुरकर यांनी केले या सभेला प्रामुख्याने अनिलजी तिडके, सुधीरजी



फटिंग, काशिनाथ ठवरे, रमेश लांजेवार, प्रमोद पालांदुरकर, राजेश पलांदुरकर, प्रकार भांडारकर, अक्षय तिडके, विरेश दुरूगकर, सचिन दहिकर, निखिल हरडे, पंकज दहिकर, राहुल शेंडे, सुरज बन्सोड, बंडुभाऊ शनिवारे, अक्षय खाणोरकर, महेश तिडके, मयुरेश दडवे, पंकज खाणोरकर, स्वप्निल रहाटे, राकेश शिरपुरकर, अनुप हरडे, कुणाल घोसेकर, पारस मोटघरे, स्वप्निल रनदिवे, अमोल तिडके,अक्षय खानोरकर सौरभ समर्थ, निखील हरडे, पंकज खानोरकर, राकेश शिरपुरकर, ऋषब डवले, अनुप हरडे, बंडुजी शनिवारे, इत्यादीसह अनेक मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.


## जाहीर प्रगटन

**ॲड. एस. डी. तांदळे**

**मा. श्रीमती टी. एक. आसरकर ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज १४६३/२०२४

**द्वारका व ईतर विरुद्ध निरंक**

अर्जदार : -
१) द्वारका श्रीकांत चौरे, वय ६१ वर्ष, धंदा घरकाम
पत्ता - गहिनीनाथ नगर, महाकाळा, ता. अंबड, जि. जालना. ह.मु. खंडाळा. ता. जि. बीड
२) गणेश श्रीकांत चौरे, वय ३0 वर्ष, धंदा शेती
रा. खंडाळा, ता. जि. बीड.
३) मनिषा जालींदर बांगर, वय ३६ वर्ष, धंदा घरकाम,
रा. शिवाजीनगर, बीड, ता. जि. बीड

**विरुद्ध**

मागणी अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत श्रीकांत विठ्ठल चौरे यांचे वारस असल्याबाबत प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्या अर्थी मयत श्रीकांत विठ्ठल चौरे यांचा मृत्यू दि. ११/0९/२0२४ रोजी गहिनीनाथ नगर, महाकाळा, ता. अंबड जि. जालना येथे झाला आहे. अर्जदार क्र १ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार २ हा मयताचा मुलगा असून अर्जदार क्र, ३ ही मयताची मुलगी आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदर कोट सदर अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांच्या हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत श्रीकांत विठ्ठल चौरे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक 0८ माहे आक्टोबर २0२४ माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १३ जानेवारी २0२५.

स्वाक्षरीत
क. लिपीक

आदेशावरुन
अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, व स्तर बीड

## माळीपूरा भागात काँग्रेस पक्षाच्यावतीने ईव्हीएम मशीनच्या विरोधात स्वाक्षरी मोहिम



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शहरातील सर्व प्रभागांमध्ये महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आ.मा. श्री. नानाभाऊ पटोले यांच्या सूचनेवरून स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येत आहे.

या अनुषंगाने जालना शहरातील प्रभाग क्रमांक. १३ व १४ माळीपूरा जामा मस्जिद येथे जालना शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख मेहमूद यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २० डिसेंबर २०२४ रविवार रोजी ईव्हीएम हटाव यासाठी स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली आहे , या स्वाक्षरी मोहीम मध्ये माळीपूरा जामा मस्जिद परिसरातील नागरिक, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते, सदरील मोहीम यशस्वी करण्यासाठी निराधार निराश्रित व्यक्ती विकास विभागाचे जिल्हाध्यक्ष जावेद अली, अब्दुल जब्बार ,शेख निजाम ,शफी अहमद, शेख अख्तर ,शेख जमीर सय्यद खालेद, शेख रफिक, शेख इमरान , शेख मुस्ताक ,मिलिंद नगराळे , शेख अली, जमीर खान, जानी बेग, शेख वजीर , शेख इरफान आदी कार्यकर्त्यांनी मोठे परिश्रम घेतले.

# राजकीय फलकबाजीला प्रतिबंध करा

## आदित्य ठाकरे यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आवाहन

**मुंबई -** मुंबईतील राजकीय फलकबाजीला आळा घालण्यासाठी आमदार आदित्य ठाकरे यांनी आता खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच आवाहन केले आहे. पक्षीय मतभेद बाजूला ठेवून सर्व राजकीय पक्षांनी बेकायदेशीर पोस्टर, बॅनर आणि होर्डिंग्ज न लावण्याचा निर्णय घेतला, तर नागरिकांना आपण मोठा दिलासा देऊ शकतो, असे आवाहन ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून केले आहे.

मुंबईत जागोजागी राजकीय फलकांचे अक्षरशः पेव फुटले आहे. या फलकबाजीबद्दल नागरिकांनी समाजमाध्यमांवरून नाराजी व्यक्त केली आहे. तसेच न्यायालयानेही या प्रकरणी मुंबई महापालिकेला फटकारले होते. मुंबई महापालिकेच्या यंत्रणेने जाहिरात फलक हटवले तरी काही विभागात काही ठराविक पक्षांचे फलक दिसत असल्याबाबतही समाजमाध्यमांवर टीका होत आहे. तसेच नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर सत्तास्थापना व शपथविधीनंतर आमदारांच्या अनुयायांनी मोठ्या प्रमाणावर फलकबाजी केली. राजकीय पक्षांच्या बरोबरीने नेत्यांचेही फलक मोठ्या प्रमाणावर दिसत आहेत. त्यामुळे आता राजकीय पक्षांनीच या फलकबाजीला आळा घालावा, अशी भूमिका शिवसेना (ठाकरे) पक्षाचे नेते, आमदार आदित्य ठाकरे यांनी घेतली आहे. त्यांनी त्याकरीता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवले आहे.

२०२५ मध्ये पदार्पण करताना, तसेच लोकसेवेचा संकल्प सोडताना पक्षीय भेदभाव आणि विचारसरणी बाजूला ठेवून नागरिकांना दिलासा देण्यासाठी राजकीय पोस्टर, बॅनर्स आणि होर्डिंग्जवर प्रतिबंध घालून आपण सगळ्यात महत्त्वाचा आणि मोठा निर्णय घेऊ शकता. गेल्या दोन वर्षांपासून झालेल्या राजकीय गोंधळामुळे, प्रत्येक शहराच्या कानाकोपऱ्यात हजारो राजकीय पोस्टर (कायदेशीर आणि बेकायदेशीर) पाहायला मिळत आहेत. एक नागरिक म्हणून हे पाहून खेद वाटतो आणि एक व्यक्ती म्हणून शहर विद्रुप करणाऱ्या अशा पोस्टर्सचा त्रास होतो. त्यामुळे राजकीय फलक न लावण्याचे आवाहन करण्याकरीता आपण पहिले पाऊल टाका, आम्हीही तुमच्या पाठीशी आहोत, असेही आश्वासन आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात दिले. या विषयी बैठक बोलावली किंवा सर्व पक्षांना पत्र पाठवावे. तर मी व माझा पक्ष आपल्यासोबत खांद्याला खांदा लावून उभा राहील, असेही ठाकरे यांनी पत्रात म्हटले आहे.

गेल्या दोन वर्षांत मुंबई महापालिकेकडून निवडक पोस्टर हटवण्यात आले. तर सत्ताधारी पक्षाचे पोस्टर मात्र तसेच दिसत आहेत, असाही आरोप आदित्य ठाकरे यांनी आपल्या पत्रात केला आहे. आपण ही बालिश राजकीय स्पर्धा बाजूला ठेवून, सर्व राजकीय पक्षांनी बेकायदेशीर पोस्टर, बॅनर आणि होर्डिंग्ज न लावण्याचा निर्णय घेतला, तर नागरिकांना आपण मोठा दिलासा देऊ शकतो. यामुळे आपली शहरे स्वच्छ दिसतीलच, शिवाय आपल्या कार्यकर्त्यांनाही अशा खर्चातून दिलासा मिळेल. जगात कुठेही असे राजकीय पोस्टर लावले जात नाहीत.

वर्षभरात २३ हजार राजकीय फलक हटवले मुंबई महापालिकेच्या अनुज्ञापन विभागाने गेल्या वर्षभरात तब्बल ६५ हजार २६७ अनधिकृत जाहिरात फलक, होर्डिंग, भित्तीपत्रके हटवली आहेत. यात राजकीय, व्यावसायिक, धार्मिक फलकांचा समावेश आहे. यामध्ये तब्बल २३ हजार ७४७ फलक राजकीय स्वरुपाचे होते. या आकडेवारीवरून अनधिकृत फलकांमध्ये सर्वाधिक राजकीय फलक असल्याचे आढळून आले आहेत.




हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827
Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com